आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या पुन्हा एकदा**

- निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक भान जपत प्रचाराच्या भाषणांचा दर्जा चांगला राखून आदर्श उदाहरण घालून द्यावं, असं निवडणूक आयोगाचं आवाहन

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराकरता आज भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नाशिकमधे सभा तर मुंबईत घाटकोपरमधे रोड शो

- इंडिया आघाडीचं सरकार सत्तेवर आल्यास गरीब कुटुंबांना दरमहा दहा किलो अन्नधान्य मोफत देण्याचं काँग्रेसचं आश्वासन

- भारतीय वायुसेनेच्या स्वदेश निर्मित भीष्म क्यूब या मोबाईल रुग्णालयाचं यशस्वी परीक्षण

  **आणि**

- नोबेल पारितोषिक विजेती लेखिका एलिस म्युन्रो यांचं निधन

**<><><><><>**

निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक भान जपत प्रचारातील भाषणांचा दर्जा चांगला राखून आदर्श उदाहरण घालून द्यावं, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. देशाच्या सामाजिक सलोख्याला तडा जाऊ नये म्हणून निवडणूक प्रचार सभांची भाषा संयत ठेवणं ही प्रथमतः नेत्यांची जबाबदारी आहे, असंही आयोगानं म्हटलं आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकांसाठी १६ मार्चला आदर्श आचार संहिता लागू झाल्यापासून विविध राजकीय पक्षांनी दाखल केलेल्या आचार संहिता भंगाच्या तक्रारींपैकी ९० टक्के तक्रारी निकाली काढण्यात

आल्याचंही आयोगानं सांगितलं. विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून दाखल झालेल्या आचार संहिता भंगाच्या ४२५ ठळक तक्रारींपैकी ४०० तक्रारींवर आवश्यक कारवाई किंवा त्यांचं निराकरण करण्यात आलं आहे. काँग्रेस आणि भाजप वगळता अन्य कुठल्याही राजकीय पक्षानं दाखल केलेली एकही तक्रार प्रलंबित नसल्याचं देखील आयोगानं नमूद केलं. आयोगानं दिलेल्या माहितीनुसार काँग्रेसनं १७० भाजपनं ९५ तर इतर पक्षांनी १६० तक्रारी दाखल केल्या आहेत. यापैकी काँग्रेस आणि भाजपनं परस्परांच्या विरोधात दाखल केलेल्या काही तक्रारी प्रलंबित आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातल्या ११ जागांसाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यासाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी आज नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघातल्या उमेदवारांसाठी जाहीर सभा घेणार आहेत. दुपारी निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं त्यांची सभा होईल. त्यानंतर ते कल्याणमध्ये महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारसभेला संबोधित करतील आणि संध्याकाळी मोदी मुंबईत घाटकोपर इथं रोड शो करणार आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याही आज नाशिकमध्ये सभा होणार आहेत. दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

<><><><><>

इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर प्रत्येक गरीब कुटुंबाला दरमहा दहा किलो अन्नधान्य मोफत दिलं जाईल, असं आश्वासन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष

मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज दिलं. उत्तर प्रदेशमध्ये लखनौ इथं मल्लिकार्जुन खर्गे आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी खर्गे बोलत होते. देशातल्या तरुणांना रोजगार मिळत नाही. जागा रिक्त असूनही नोकर भरती केली जात नाही, असा आरोप खर्गे यांनी केला. तसंच आपलं सरकार आल्यावर जातनिहाय जनगणना करणार असल्याचंही खर्गे म्हणाले. तर इंडिया आघाडीला लोकांचा पाठिंबा मिळत असून उत्तर प्रदेश आणि देशभरात आपण सर्वाधिक जागा जिंकू, असा विश्वास समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी व्यक्त केला. तसंच आपलं सरकार आल्यावर सर्व सरकारी रिक्त जागांवर नोकर भरती करू, असंही यादव म्हणाले.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ' उत्तर मध्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

वैद्यकीय क्षेत्रात संशोधन,शिक्षण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यासाठी नवी दिल्लीच्या एम्स या संस्थेनं युनिव्हर्सिटी ऑफ बोल्टन इन्स्टिटयूट ऑफ मेडिसिन या संस्थेशी सामंजस्य करार केला आहे. दोन्ही संस्थेच्या अधिकाऱ्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित कार्यक्रमात या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची देवाणघेवाण, शैक्षणिक परिषदा,एकत्रित पदवी अभ्यासक्रम राबवणे असे उपक्रम आता या दोन्ही संस्था एकत्रितपणे करतील.

<><><><><>

भारतीय वायुसेनेच्या स्वदेश निर्मित भीष्म क्यूब या मोबाईल रुग्णालयाचं आज आग्रा इथं यशस्वी परिक्षण झालं.

हे अत्याधुनिक मोबाईल रुग्णालय भारत हेल्थ इनिशिएटीव फॉर सहयोग हित अँड मैत्री या भव्य उपक्रमाचा एक भाग आहे. या रुग्णालयामुळे आपत्कालीन परिस्थितीत जलद आणि तत्पर आरोग्यसेवा देता येईल, असं केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविय यांनी म्हटलं आहे. या मोबाईल रुग्णालयात एकावेळी जवळपास २०० रुग्णांवर उपचार करता येतील. वॉटरप्रूफ, कमी वजनाचं आणि अत्याधुनिक असं हे मोबाईल रुग्णालय आपत्कालीन परिस्थितीतल्या वैद्यकीय सेवेसाठी सर्वोत्तम पर्याय म्हणून उभारण्यात आलं आहे.

<><><><><>

नोबेल पारितोषिक विजेती लेखिका एलिस म्युन्रो यांचं सोमवारी निधन झालं. ब्याण्णव वर्षांच्या म्युन्रो यांना विस्मरणाचा आजार होता. त्यांना २०१३ मध्ये नोबेल पुरस्कार मिळाला. नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या कॅनेडियन लेखिका. समकालीन लघुकथालेखनात स्वामिनी म्हणून नोबेल समितीने त्यांचा गौरव केला होता. कथांमधला दृष्टीकोन आणि करुणा यासंदर्भात त्यांची रशियन लेखक अंतोन चेखोव यांच्याशी तुलना केली जाते. गव्हर्नर जनरल ॲवॉर्ड हा कॅनडाचा सर्वोच्च पुरस्कार १९६८ मध्ये त्यांना मिळाला होता. २००९ मध्ये मुन्रो यांना मॅन बुकर आंतरराष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

<><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घरासमोर आज भाजपाच्या महिला आघाडीनं निदर्शनं केली. गेल्या आठवड्यात केजरीवाल यांच्या खाजगी सचिवानं राज्यसभेच्या खासदार स्वाती मालीवाल यांच्याशी गैरवर्तन केल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आलं. केजरीवाल हे महिलाविरोधी असल्याचं सांगत त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी आंदोलकांनी यावेळी केली.

<><><><><>

दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांची न्यायालयीन कोठडी राऊज एवेन्यू न्यायालयानं ३० मे पर्यंत वाढवली आहे. दिल्ली उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणी सीबीआय सध्या सिसोदिया यांची चौकशी करीत आहे. त्यांना आज व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून न्यायालयात हजर करण्यात आलं.

<><><><><>

मुंबईत घाटकोपर परिसरात गेल्या सोमवारी होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत घटनास्थळी आणखी दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले. कोसळलेलं होर्डिंग आणि अन्य राडारोडा हटवण्याचं काम अद्याप सुरु आहे. घटनास्थळावर पेट्रोलपंप असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीनं हे काम काळजीपूर्वक करावं लागत आहे. पेट्रोलपंपावर आज अचानक आग लागली होती. मात्र ती ताबडतोब आटोक्यात आणण्यात आली. या दुर्घटनेत १४ जण मरण पावले तर ८८ जण जखमी झाले असून त्यातल्या ४३ जणांवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

दरम्यान याप्रकरणी होर्डींगमालकावर गुन्हा दाखल झाला असून तो फरार आहे.

<><><><><>

राजस्थानमध्ये झुनझुन जिल्ह्यात काल हिंदुस्थान कॉपर लिमिटेडच्या संरक्षण चमूचे चौदा अधिकारी आणि कर्मचारी काल कोळश्याच्या खाणीत अडकले होते. त्यातल्या तिघांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आलं आहे. खाणीत जाणाऱ्या लिफ्टचा दोर तुटल्यामुळे ही दुर्घटना घडली. शंभर मीटर खोलीवर अडकलेल्यांना सोडवण्यासाठी बचावपथकाचं काम सुरु आहे. वैद्यकीय पथक आणि रुग्णवाहिका घटनास्थळी हजर आहेत.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्सचा सामना पंजाब किंग्जशी होणार आहे. पंजाब किंग्ज संघ आधीच प्ले ऑफमधून बाहेर पडला आहे, तर राजस्थान रॉयल्सचं अव्वल चार संघात स्थान मिळवण्याचं लक्ष्य असेल. दरम्यान, काल रात्री दिल्ली इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं लखनौ सुपर जायंट्स संघाचा १९ धावांनी पराभव केला.

<><><><><>

टेबलटेनिस पटू मनिका बात्राने जागतिक स्तरावर पहिल्या २५ खेळाडूंच्या यादीत स्थान पटकावलं आहे. सौदी स्मॅशमधल्या उत्तम कामगिरीने तिला २४ वा क्रमांक मिळाला आहे. या सामन्याआधी ३९ क्रमांकावर असलेली मनिका १५ क्रमांकांची झेप घेऊन २४ व्या क्रमांकावर पोचली.

<><><><><>

एफआयएच हॉकी स्पर्धेसाठी भारतीय पुरुष हॉकी संघ आज बेल्जियमला रवाना झाला. भारताचा पहिला सामना २२ मे रोजी अर्जेटिंनासोबत होणार आहे. त्यानंतर २३ आणि २५ मे रोजी बेल्जियमशी तर २६ मे रोजी पुन्हा एकदा अर्जेंटिनाशी भारताची लढत होईल. त्यानंतरच्या टप्प्यात लंडनमध्ये भारताचा सामना जर्मनी आणि इंग्लंडशी होणार आहे. दरम्यान, पॅरीस ऑलिम्पिकच्या पार्श्वभूमीवर ही मालिका महत्वाची असल्याचं भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंह याने सांगितलं.

//<><><><><>//